MHSN030042422020					
	दाखल दिनांक	:	०७/०९/२०२०		
	नोंदणी दिनांक	:	०७/०९/२०२०		
	निकाल दिनांक	:	०५/०५/२०२६		
	कालावधी	:	वर्षे	महिने	दिवस
			०५	०७	२८

<u>सांगली येथील मुख्य न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u>

<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्रमांक १), सांगली.</u>

(पीठासीन अधिकारी : रोहिणी सं. पाटील)

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३३८०/२०२० निशाणी ५३

गुन्हाः– कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ प्रमाणे

फिर्यादी	**आदीअरिहंत म्युच्युअल बेनिफिट निधी लिमिटेड तर्फे वसुली अधिकारी वीरचंद्र सुभाष वळवडे,** वय – २६ वर्षे, व्यवसाय – नोकरी, रा. वखारभाग, सांगली, ता. मिरज, जि. सांगली
फिर्यादीतर्फे विधिज्ञ	श्री. व्ही. जी. पटवेगार.
आरोपी	**नवाज नजीर मुजावर,** वय – सज्ञान, व्यवसाय – व्यापार, रा. मुजावर गल्ली, दर्गा वेस, कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली.
आरोपीतर्फे विधिज्ञ	श्री. के. जे. भोसले.

भाग–ब.

गुन्हा घडल्याचा दिनांक	१०/०७/२०२०
फिर्याद दाखल केल्याचा दिनांक	०७/०९/२०२०
प्रतिकथन नोंदविलेचा दिनांक	२२/०२/२०२२
प्रकरण पुराव्याला निश्चित केल्याचा दिनांक	१९/०३/२०२२
प्रकरण न्यायनिर्णयाकरिता निश्चित केल्याचा दिनांक	०८/०४/२०२६
न्यायनिर्णयाचा दिनांक	०५/०५/२०२६
शिक्षा दिल्याचा दिनांक, आदेश, इतर काही	दोषी.

आरोपी बाबतचा तपशील.

आरोपी क्रमांक	आरोपीचे नाव	अटक केल्याची तारीख.	जामिनावर सोडल्याची तारीख.	दाखल गुन्हा.	शिक्षा किंवा दोषमुक्त केले ?	दिलेली शिक्षा	प्रकरण दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी.
१.	**नवाज नजीर मुजावर**	निरंक.	दि. २२.०२. २०२२.	कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ प्रमाणे.	आरोपीस दोषी ठरवण्यात येते.	एक वर्षाकरिता साधी कैद व दंड.	निरंक.

: **न्यायनिर्णय** :

(निकाल तारीख ०५ मे, २०२६)

आरोपीविरुद्ध परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ (संक्षेपाकरिता याचा उल्लेख यापुढे 'सदर अधिनियम' असा करण्यात आला आहे.) प्रमाणे प्रस्तुत खटला दाखल केला आहे.

फिर्यादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे कीः–

२. फिर्यादी कंपनी ही कंपनी कायदा २०१४ अन्वये नोंदणीकृत असून ती छोट्या गरजू व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी व्यावसायिक कर्ज स्वरूपात आर्थिक मदत करण्याचा व्यवसाय करते. त्याचप्रमाणे स्थावर मालमत्ता तारण कर्ज, सोने तारण कर्ज, वैयक्तिक कर्ज इत्यादी, तसेच ग्राहकांच्या पिग्मीवर देखील कर्जाचा पुरवठा करण्याचा व्यवसाय करते. फिर्यादी निधीचा मुख्यत्वे कर्ज वितरणाचा व्यवसाय असून फिर्यादी निधी ही ग्राहकांकडून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन कायदा व नियमाप्रमाणे तारण आणि कर्जाचा करार फिर्यादी व ग्राहकामध्ये होतो. फिर्यादी निधी ही छोट्या कर्जासाठी पिग्मी स्वरूपात कर्ज रक्कम व व्याजाची वसुली ग्राहकांकडून करीत असते. फिर्यादी निधीने शाखाधिकारी रूमाना सईद शेख आणि तर्फे कर्ज वसुली अधिकारी वीरचंद्र सुभाष वळवडे यांना आरोपींना नोटीसा पाठवणे, फिर्याद दाखल करणे, सह्या करणे, ॲफिडेव्हीट दाखल करणे, जाबजबाब देणे, कागदपत्र दाखल करणे असे सर्व अधिकार दिलेले असून त्यांनी प्रस्तुत फिर्याद दाखल केली आहे.

३. फिर्यादी यांचे पुढील कथन असे की, आरोपीचा रिक्षा वाहतुकीचा व्यवसाय असून त्याला व्यवसायाचे विस्तारासाठी रक्कम रू. ५०,०००/– इतक्या

रक्कमेची गरज होती. त्यासाठी आरोपीने फिर्यादी निधीमध्ये कर्ज मागणी अर्ज भरून कागदपत्रांची पूर्तता केली होती. आरोपीच्या कर्ज मागणीच्या अर्जाचा आणि कागदपत्रांचा विचार करून फिर्यादी निधीने आरोपीला रक्कम रू. ५०,०००/–इतके व्यवसाय कर्ज मंजूर केले. सदरचे कर्ज १६ टक्के व्याजदराने रक्कम रू. ४८३३.३३/– प्रमाणे एकूण १२ मासिक समान हप्त्याने भरण्याच्या अटीवर सदर कर्जाची रक्कम आरोपीला दिली. सदर कर्जाची रक्कम आरोपीने त्याच्या व्यवसायाकरिता वापरलेले आहे. फिर्यादी निधीमध्ये आरोपीचे कर्ज खाते क्र. ६०, बचत खाते क्र. १९७ आणि पिग्मी खाते क्र. ९००० असे आहे. सदर कर्ज घेताना फिर्यादी निधीने व्यावसायिक कर्ज परतफेडीसाठी घालून दिलेले व्याज, हप्ते व मुदतीच्या सर्व अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्याची हमी व आश्वासन आरोपीने दिले होते. सदर आश्वासनावर विसंबून फिर्यादी निधीने आरोपीला सदर कर्ज रक्कम अदा केलेली आहे.

४. फिर्यादी यांचे पुढील कथन असे की, आरोपीने फिर्यादी निधीकडून कर्ज रक्कम घेतल्यानंतर त्यावर रक्कम रू. ४८३३.३३/– इतका मासिक हप्ता रोज पिग्मी भरून परतफेड करणार असल्याची हमी व आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे फिर्यादी निधीने आरोपीला माहे डिसेंबर २०१९ मध्ये कर्ज वितरण केले आहे. तद्नंतर आरोपीने माहे जानेवारी २०२० पर्यंत हप्त्याची रक्कम रू. ४८३३.३३/– भरली होती. परंतु तद्नंतर आरोपीने माहे फेब्रुवारी २०२० पासून हप्ता भरला नाही. त्यामुळे फिर्यादी निधीने आरोपीला नियमितपणे पिग्मी भरून मासिक हप्त्याची रक्कम सुरळीत ठेवण्याची विनंती करत होते. आरोपीकडून फिर्यादी निधीस माहे जून २०२० पर्यंत हप्त्याची रक्कम व दंडव्याजाची रक्कम धरून एकूण रक्कम रू. २४,९१६.६५/– इतकी कर्जाची रक्कम देय होती. फिर्यादी निधीचे कर्मचारी आरोपीस वारंवार कर्जाचे हप्ते सुरळीत भरण्याचा तगादा

लावत असल्याने आरोपीने फिर्यादी निधीस कर्ज प्रकरण करतेवेळी त्याचे दि सारस्वत को. ऑप. बँक लि., शाखा – कुपवाड या बँकेतील खाते क्र. १७६२०३१०००१२०२१ वरील धनादेश क्र. ०९५३४० दि. १०.०७.२०२० रोजीचा रक्कम रू. २४,९१५/– हा धनादेश थकीत कर्जाच्या रक्कमेच्या अंशतः फेडीपोटी दिला. सदरचा धनादेश फिर्यादी निधीने त्यांचे बँक खात्यात जमा केला असता तो दि. १४.०७.२०२० रोजी 'फंड्स इनसफिशिएंट' असा शेऱ्यानिशी न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी निधीचे पदाधिकारी यांनी आरोपीस धनादेश न वटलेची हकिगत सांगून थकीत कर्ज खाते सुरळीत करण्याची वारंवार विनंती करत होते. परंतु त्यास आरोपीने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

५. फिर्यादी यांचे पुढील कथन असे की, त्यामुळे फिर्यादी निधीने त्यांचे वकीलांमार्फत दि. २२.०७.२०२० रोजी रजि.ए.डी. पोस्टाने आरोपीस नोटीस पाठवून धनादेश रक्कमेची मागणी केली. सदरील नोटीसचा लखोटा आरोपीने स्वीकारले नसल्याने तो दि. २४.०७.२०२० रोजी परत आला. तथापि, आरोपीने नोटीस मध्ये नमूद असलेली रक्कम फिर्यादीस मुदतीत परत केली नाही. सबब, आरोपीने फिर्यादी निधीची फसवणूक करून नुकसान केलेले आहे. वरील कारणास्तव फिर्यादी निधीने आरोपीविरुद्ध सदर अधिनियमचे कलम १३८ अन्वये खटला दाखल केला.

६. प्रस्तुत प्रकरणात माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुद्ध आदेशिका दि. १६.०९.२०२१ रोजी जारी केले. आरोपी हजर झाल्यानंतर त्याचे दोषारोप निशाणी ११ प्रमाणे दि. २२.०२.२०२२ रोजी नोंदवण्यात आले.

७. फिर्यादीने स्वतःच्या कथनांच्या समर्थनाकामी स्वतःला निशाणी ५

प्रमाणे तपासले व कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली. वरील प्रमाणे पुरावा दिल्यानंतर निशाणी ४५ प्रमाणे पुरावा बंद पुरशिस दिली.

८. आरोपी व त्याचे वकील हे त्यानंतर वारंवार गैरहजर राहत असल्याने आरोपीविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले. तरीदेखील आरोपी हजर न झाल्याने फिर्यादीचे वकील यांनी निशाणी ४६ प्रमाणे अर्ज करत आरोपी हे कोणत्याही सबबीशिवाय गैरहजर राहत असल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन वगळून प्रकरण युक्तिवादाकरिता लावावे अशी विनंती करणारा अर्ज दिला. सदरील अर्ज मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील न्यायनिवाडा नवनितसिंग गोजीया व सिमरनकौर गोजीया वि. महाराष्ट्र सरकार आणि सुषमा चांडक, क्रिमिनल रिव्हीजन अर्ज क्र. ७०/२०२३ नि.ता. २०.०९.२०२४ या निकालाचे आधारे दि. २७.०१.२०२६ रोजी मंजूर करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीचा युक्तिवाद दि. ०२.०२.२०२६ रोजी ऐकण्यात आला. मात्र त्यानंतर दि. ०९.०२.२०२६ रोजी आरोपी हा न्यायालयात हजर झाला व त्याने अजामीनपात्र वॉरंट रद्द करण्यासाठी निशाणी ४९ प्रमाणे अर्ज दिला. सदरील अर्ज दंडावर तसेच पुढील तारखांना हजर राहण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणातील आरोपीने निशाणी ४६ वरील आदेश रद्द करून त्याचे बयाण नोंदवण्यात यावे असा विनंती अर्ज निशाणी ५० वर दिला. तो अर्ज दि. २०.०२.२०२६ रोजी मंजूर करण्यात आला. सदरील अर्जामध्ये आरोपीला पुढील तारखेस न चुकता निवेदन नोंदवण्यासाठी हजर राहण्याचे आदेश करण्यात आले. मात्र आरोपी हे गैरहजर राहत असल्याने त्यांचा गैरहजेरीमाफीचा अर्ज नामंजूर करण्यात आला व आरोपीविरुद्ध निशाणी ५२ प्रमाणे अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले. त्यानंतर आरोपी हजर न झालयाने आरोपीविरूध्द निशाणी ४६

वर केलेला आदेश कायम करण्याबाबत आदेश निशाणी १ वर दि. ०८.०४.२०२६ रोजी पारित करण्यात आला व सदरील प्रकरण आरोपीच्या युक्तिवादाशिवाय निकालासाठी घेण्यात आले.

९. फिर्यादी पक्षातर्फे विद्वान वकील श्री. व्ही. जी. पटवेगार यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखात सादर केलेल्या पुराव्याचे परिशीलन केल्यानंतर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघाले असुन त्या मुद्द्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१	फिर्यादी निधीने हे सिद्ध केले आहे काय की, तथाकथित वादातील धनादेश क्र. ०९५३४० दि. १०.०७.२०२० रोजीचे रक्कम रु. २४,९१५/- हा आरोपीने फिर्यादी निधीस कायदेशीर उत्तर दायित्वापोटी त्याचे कायदेशीर देणेबाबत दिला होता ?	**होकारार्थी**
२	फिर्यादी निधीने हे सिद्ध केले आहे काय की, वादातील धनादेश हा आरोपीच्या खात्यावर ''अपर्याप्त निधी'' या शेऱ्यानिशी दि. १४.०७.२०२० रोजी अनादरित झाला ?	**होकारार्थी**
३	फिर्यादी निधीने हे सिद्ध केले आहे काय की, धनादेश न वटल्याबाबत आरोपीस दिलेली दि.२२.०७.२०२० रोजीची नोटीस आरोपीने न स्वीकारल्यामुळे सदरील नोटीस लखोट्यासहीत परत आली?	**होकारार्थी**
४	आदेश काय ?	**अंतिम आदेशाप्रमाणे**

: कारणमीमांसा :

१०. परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ कलम १३८ चा गुन्हा शाबीत होणेकामी खालील घटक शाबीत होणे गरजेचे आहेः–

अ. फिर्यादी निधीस आरोपीने धनादेश हा कायदेशीर देणे देण्याकरिता दिलेला होता.

ब. सदरचे धनादेश फिर्यादी निधीने बँकेत विहित मुदतीत सादर केले.

क. विहित मुदतीतच ते अनादरित झाले.

ड. फिर्यादी निधीने आरोपीला धनादेश रक्कम मागणीची कायदेशीर नोटीस विहित मुदतीत अचूक पत्त्यावर पाठविली.

मुद्दा क्र.१ बाबत

११. फिर्यादी निधीने त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले आहे की, फिर्यादी संस्थेने शाखाधिकारी रूमाना सय्यद व त्यांना फिर्याद दाखल करण्यासाठी आरोपींना नोटीस पाठवणे, फिर्याद दाखल करणे, सह्या करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे याकरिता सर्व अधिकार दि. १५.०७.२०२० रोजीच्या ठरावाने दिलेली आहे असे कथन केले आहे. सदरील साक्षीदाराने सदरील ठरावाची सहीशिक्क्याची प्रमाणित प्रत निशाणी २८ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेले आहे. फिर्यादीचे साक्षीदार यांनी आरोपी यांनी रिक्षा वाहतुकीच्या व्यवसायासाठी व त्यांच्या व्यवसायाच्या विस्तारासाठी रक्कम रू. ५०,०००/– आवश्यक असल्याबाबत कर्ज मागणी अर्ज व सर्व कागदपत्रांची पूर्तता करून त्यांच्या संस्थेकडे सादर केला होता असे कथन केले आहे तसेच फिर्यादी संस्थेने आरोपीच्या कर्ज मागणी अर्जाचा व कागदपत्रांचा विचार करून आरोपीला रक्कम

रू. ५०,०००/– व्यवसाय कर्ज १६ टक्के व्याजदराने म्हणजे रक्कम रू. ४८३३.३३/– इतक्या बारा मासिक समान हप्त्याने भरण्याच्या अटीवर मंजूर केले होते. फिर्यादी संस्थेमध्ये आरोपीचे कर्ज खाते क्र. ६०, बचत खाते क्र. १५७ व पिग्मी खाते क्र. ९००० असे आहे. फिर्यादीने आरोपीच्या कर्ज खात्याचा खाते उतारा देखील अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर कथनांच्या समर्थनकामी फिर्यादी संस्थेने कर्ज मागणी अर्ज, कर्ज मंजुरी पत्र, फिर्यादी व आरोपी यांचेत झालेला तारण व कर्जाचा करार, आरोपीने करून दिलेले प्रॉमिसरी नोट, आरोपीने दिलेले कर्जाची पोहोच पावती व आरोपीने फिर्यादीस करून दिलेले हमीपत्र अनुक्रमे निशाणी ३६ ते ४१ प्रमाणे अभिलेखावर मूळ प्रतीत दाखल केले आहे.

१२. आरोपीने ठरल्याप्रमाणे जानेवारी २०२० पर्यंत हप्त्याची रक्कम ४८३३.३३/– भरली होती. मात्र तद्नंतर फेब्रुवारी २०२० पासून आरोपीने हप्ता नियमित भरला नाही. त्यामुळे फिर्यादी निधीचे एजंट यांनी आरोपीला नियमित पिग्मी भरून मासिक हप्त्याची रक्कम पिग्मी खात्यावर जमेल या प्रमाणे पिग्मी भरून कर्ज खाते सुरळीत ठेवण्याची विनंती केली. आरोपीकडून फिर्यादी निधीस हप्त्याची रक्कम व दंड व्याजाची रक्कम मिळून २४,९१६.६५/– इतकी कर्जाऊ रक्कम देय होती. फिर्यादी निधीचे कर्मचारी यांनी आरोपीकडून कर्जाचे हप्ते सुरळीत भरण्यासाठी तगादा लावला असल्याने आरोपीने दि सारस्वत को.ऑप. बँक शाखा कुपवाड या बँकेतील स्वतःचे खाते क्र. १७६२०३१०००१२०२१ वरील धनादेश क्र. ०९५३४० दि. १०.०७.२०२० रोजी भरण्यासाठी रक्कम रू. २४,९१५/– चा दिला. फिर्यादीने त्याच्या पुराव्यादरम्यान सदरील वादग्रस्त धनादेश निशाणी २९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेला आहे.

१३.   साक्षीदारांच्या वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता वादग्रस्त धनादेश हा आरोपीने त्याचे कायदेशीर देणे भागवण्यासाठी दिला होता असे नमूद केले आहे. परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३९ प्रमाणे असलेल्या गृहितकानुसार जोपर्यंत आरोपी वादग्रस्त धनादेश कायदेशीर देण्यापोटी दिलेला नव्हता, हे शाबीत करत नाही तोपर्यंत वादग्रस्त धनादेश कायदेशीर देण्यापोटीच दिला होता, असे गृहीत धरले जाते. सदर गृहीतकाचे खंडन करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे. सदर गृहीतकाचे खंडन आरोपी हा फिर्यादी पक्षाचे तोंडी अथवा कागदोपत्री पुराव्याचे आधारे करू शकतो. जर सदरचे गृहीतक आरोपीने खंडन केले तर आरोपी फिर्यादीस कसे कायदेशीर देणे लागतो हे सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादीवर येते. आरोपीने प्रस्तुत प्रकरणात स्वतःला तपासलेले नाही. मात्र फिर्यादीचा उलटतपास घेतलेला आहे. सबब आरोपीने अभिलेखावर त्याच्या बचावादरम्यान सदरील गृहीतकाचे खंडन करणेकामी काय पुरावा आणला आहे हे पाहणे गरजेचे आहे.

१४.   प्रस्तुत प्रकरणातील आरोपीने सदर साक्षीदाराचा सविस्तर उलटतपास घेतलेला आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान डिसेंबर २०२० पासून ते फिर्यादी संस्थेत कार्यरत असून आरोपीने फिर्यादी संस्थेकडे कर्ज मागणी अर्ज अथवा कर्जापोटी जे कागदपत्र लिहून दिले होते त्याची त्यांना माहिती नसल्याचे मान्य केले आहे. सदरील साक्षीदाराने फिर्यादी संस्थेने दि. ०९.१२.२०१९ रोजी आरोपीला कर्ज ५०,०००/– रुपये अदा केले होते असे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला कर्ज दिले जाते त्यावेळी त्यांची संस्था संबंधीत व्यक्तीकडून चार कोरे धनादेश सुरक्षिततेपोटी घेते असे त्यांनी मान्य केले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश हा आरोपीकडून सुरक्षिततेपोटी घेतलेल्या धनादेशापैकी एक असून

धनादेशावरील रक्कम व तारीख ही त्यांच्या संस्थेतील लोकांनी भरलेली होती असे त्यांनी मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश हा त्यावरील नमूद तारखेस आरोपीने फिर्यादी संस्थेस दिला नव्हता हे देखील मान्य केले आहे. साक्षीदाराने आरोपीला कधीही कर्जाची रक्कम मिळाली नव्हती, हे अमान्य केले आहे. सदर साक्षीदाराने खाते उताऱ्यावरील नोंदी हा तो स्वतः लिहितो हे त्यांनी नमूद करत त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही असे मान्य केलेले आहे. सदर साक्षीदाराने सुरक्षिततेपोटी दिलेल्या धनादेशाचा गैरवापर करत प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केले आहे, हे अमान्य केले आहे.

१५. फिर्यादीने त्याच्या युक्तिवादादरम्यान असे नमूद केले आहे की धनादेशामधील नमूद असलेली रक्कम ही आरोपी फिर्यादीस कायदेशीररीत्या देणे लागत होता व त्या कायदेशीर देयत्वाच्या अंशतः परतफेडीपोटी आरोपीने फिर्यादीस प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश दिला होता हे फिर्यादीने वाजवी संशयापलीकडे शाबीत केलेले आहे. सबब, आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे. फिर्यादीचे वकिलांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील न्यायनिर्णय **सॅम्पली सत्यनारायण राव वि. भारतीय नविनीकरण ऊर्जा विकास एजन्सी लिमिटेड,** क्रि.अपील नं. ८६७/२०१६, नि.ता. १९.०९.२०१६ यांचेकडील न्यायनिर्णय यावर भिस्त ठेवली आहे. सदरील न्यायनिर्णयाप्रमाणे जेव्हा प्रकरणामध्ये पोस्ट डेटेड चेक जारी करण्यात आले तेव्हा कर्ज मंजुर झालेले होते. त्यामुळे सदरील धनादेश हे कर्जासाठी जारी केलेले धनादेश होते, त्यामुळे सदरील धनादेश हे कायदेशीर देयत्वापोटी दिलेले नव्हते असे म्हणता येणार नाही, असे गृहीत धरले आहे. आरोपीने फिर्यादीचे सदरील कथन युक्तिवाद करून खंडीत केलेले नाही.

१६. प्रस्तुत प्रकरणातील तोंडी कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादीने आरोपीचा कर्ज मागणी अर्ज, त्यांचे संस्थेचे कर्ज मंजुरी पत्र व कर्जासंबंधाने झालेले इतर कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादी संस्थेकडे कर्ज मागणीचा अर्ज केला होता व सदरील कर्ज आरोपीला १६ टक्के व्याजदराने १२ महिन्याच्या कालावधीकरिता पिग्मी अगेन्स्ट लोन या शीर्षकाखाली मंजूर देखील झालेले होते.

१७. प्रस्तुत प्रकरणातील आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासाचे अवलोकन केले असता आरोपीने कर्ज म्हणून मंजूर झालेली रक्कम प्राप्त झाली होती हे दाखवणारा कोणताही कागद अभिलेखावर दाखल केलेला नाही असे साक्षीदाराने मान्य केले आहे. मात्र आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान प्रस्तुतचा धनादेश हा कर्ज अदा केल्यानंतर त्याच्याकडून सुरक्षिततेपोटी घेतला होता असे अभिलेखावर आलेले आहे. सबब सदरील सुरक्षिततेपोटी दिलेला वादग्रस्त धनादेश हा आरोपीला कर्ज अदा झाल्यानंतरच फिर्यादी संस्थेकडे देण्यात आला होता ही बाब शाबीत होते.

१८. आरोपीने उलटतपासादरम्यान सदरील धनादेश हा सुरक्षिततेपोटी व कोरा घेतला असल्याचे अभिलेखावर आणत प्रस्तुत धनादेशाचा गैरवापर केला आहे असा बचाव घेतल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदाराने वादग्रस्त धनादेश हा कोरा व सुरक्षिततेपोटी घेतला होता व सदरील धनादेशावरील तारीख व रक्कम ही त्यांच्या संस्थेच्या व्यक्तीने भरलेली आहे, असे देखील उलटतपासामध्ये मान्य केलेले आहे. प्रस्तुतचा वादग्रस्त धनादेश हा सुरक्षिततेपोटी घेतलेला होता याबाबत निशाणी ३८ चे अवलोकन केले असता दिसून येते. सदरील बचावाचे अवलोकन केले असता मला प्रस्तुत अधिनियमचे कलम ११९ व १३९ अंतर्गत या संदर्भात असलेली

कायदेशीर स्थिती लक्षात घ्यावी लागेल. जर एखाद्या व्यक्तीने वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असेल आणि सदरील कर्ज परतफेडीच्या हमीपोटी जर कोरा धनादेश स्वतःहून बँकेला दिला असेल, तर असा कोरा धनादेश हा कर्ज रक्कमेच्या परतफेडीचे सुरक्षिततेपोटी दिलेला आहे आणि असा धनादेश बँकेला स्वतः भरून वटण्यासाठी टाकण्याचा अधिकार आहे. याशिवाय प्रस्तुत प्रकरणातील आरोपीने सदरील धनादेशावरील सही अमान्य केलेली नाही, तसेच सदरील धनादेश हा कायदेशीर देयत्त्वापोटी दिलेला नव्हता तरीदेखील सदरील धनादेशाचा फिर्यादीने गैरवापर केलेला आहे ही बाब आरोपीने फिर्यादीच्या उलटतपासादरम्यान अथवा स्वतःचा उलटतपास देऊन अभिलेखावर आणलेली नाही. फिर्यादीला त्याचे उलटतपासादरम्यान केवळ सूचनात्मक प्रश्न विचारले म्हणून आरोपीचा बचाव शाबीत झाला असे म्हणता येणार नाही.

१९. फिर्यादीचे उलटतपासाचे अवलोकन केले असता आरोपीने वादग्रस्त धनादेशावरील सही तसेच तो धनादेश फिर्यादीला दिलेला होता, ही बाब नाकारलेली नाही. आरोपीने फिर्यादीकडून देय असलेली रक्कम विवादीत करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र आरोपीने तो फिर्यादीला प्रस्तुत प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे दि. १०.०७.२०२० रोजी रक्कम रू. २४,९१५/– चे कायदेशीर देणे लागत नव्हता, ही ठोस पुराव्यानिशी अभिलेखावर आणून वर नमूद गृहीतकाचे खंडन केलेले नाही. वरील कारणास्तव अभिलेखावरील पुराव्याचे व न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता आरोपी हा फिर्यादीचे कायदेशीर देणे रक्कम रू. २४,९१५/– लागत होता व सदरील रक्कमेच्या परतफेडीसाठी त्याने वादग्रस्त धनादेश निशाणी २९ फिर्यादीला दिलेला होता, ही बाब फिर्यादीने वाजवी संशयापलीकडे शाबीत केलेली आहे. सबब, मी मुद्दा

क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र.२ बाबत

२०. फिर्यादी संस्थेने वादग्रस्त धनादेश निशाणी २९ दि. १०.०७.२०२० हा दि. १४.०७.२०२० रोजी वठण्यासाठी बँकेत भरला. मात्र वादग्रस्त धनादेश 'अपर्याप्त निधी' अशा शेऱ्यानिशी दि. १४.०७.२०२० अनादरित झाले व त्याबाबतचा परतावा फिर्यादी संस्थेला प्राप्त झाला. सदर कथनांचे समर्थनाकामी फिर्यादी संस्थेने निशाणी ३० प्रमाणे धनादेश परतावा दाखल केलेला आहे. आरोपीतर्फे निशाणी २९ वरील धनादेश हा अनादरित झाला होता ही बाब नाकारण्यात आलेली नाही.

२१. परक्राम्य संलेख अधिनियम कायदा कलम १४६ चे गृहीतकाचे प्रमाणे जोपर्यंत अशी वस्तुस्थिती नाकारण्यात येत नाही तोपर्यंत धनादेश परताव्यावर धनादेश अनादरित झाल्याची खूण, सही व अधिकृत शिक्का असल्यास त्यावर नमूद असलेला धनादेश हा अनादरित झाला असे म्हणता येईल. प्रस्तुत प्रकरणात आरोपीतर्फे धनादेश परतावा निशाणी ३० विवादीत करण्यात आलेला नाही. निशाणी ३० वर निशाणी २९ वरील धनादेश अनादरित झाल्याचे कारण, संबंधित बँकेचा शिक्का व सही आहे. सबब, वादग्रस्त धनादेश हा न वटता दि. १४.०७.२०२० रोजी धनादेश परतावा निशाणी ३० प्रमाणे परत आला होता असे वाजवी संशयापलीकडे शाबीत झाले आहे. वरील कारणास्तव मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र.३ बाबत

२२. फिर्यादीच्या पुराव्यादरम्यान पुढे असे आले आहे की, वादग्रस्त धनादेश

न वटल्याने त्याबाबत फिर्यादीने आरोपीला दि. २२.०७.२०२० रोजी वकीलांमार्फत नोटीस निशाणी ३१ प्रमाणे पाठविली होती. सदरील नोटीस आरोपीने तो परगावी असल्याने स्वीकारली नाही. सबब, सदरील नोटीस फिर्यादीला परत आली. सदर कथनांच्या समर्थनाकामी फिर्यादीने पोस्टल रिसीट व परत आलेला लखोटा अनुक्रमे निशाणी ३२ व ३३ प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे.

२३. फिर्यादीच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता माझ्या असे निदर्शनास येते की, सदरील नोटीस प्राप्त झाल्याची बाब नाकारण्यात आलेली आहे. मात्र फिर्यादीचे निशाणी ३१ वरील नोटीस वरील पत्ता व निशाणी १ वरील पत्ता हा एकच आहे असे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात याच पत्त्यावर समन्स लागल्यानंतर आरोपी न्यायालयात हजर झालेला आहे. सबब, सदरील नोटीस ही आरोपीच्या बरोबर असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे. सबब, आरोपीने निशाणी ३१ वरील नोटीस घेण्यास जरी नकार दिला असला तरी आरोपीस सदरील नोटीस विहित कालावधीमध्ये मिळाली होती ही बाब शाबीत होते. वरील कारणास्तव आरोपीला निशाणी ३१ वरील नोटीस दि. २४.०७.२०२० रोजी प्राप्त झाली होती ही बाब शाबीत होते. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्रमांक ४ बाबतः–</u>

२४. सदर प्रकरणातील आरोपी यांचेविरुद्ध निशाणी २९ वरील धनादेश हा कायदेशीर देयत्वापोटी देण्यात आला होता हे शाबीत झालेले आहे. तसेच सदरील वादग्रस्त धनादेश न वटल्याने अनादरीत झालेले आहे. फिर्यादीने आरोपीला मागणी नोटीस त्याच्या राहत्या पत्त्यावर पाठविली होती. तरीदेखील आरोपीने कायदेशीररीत्या

देय असलेली रक्कम पंधरा दिवसात भरलेली नाही हे वाजवी संशयापलीकडे शाबीत झालेले आहे. सबब, सदरील आरोपीस दोषी ठरवण्यात येते. फिर्यादी व फिर्यादीचे वकील व आरोपी व आरोपीचे वकील गैरहजर.

२५. युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरणाचे स्वरूप पाहता सदरील प्रकरण हे आर्थिक स्वरूपाचे असल्याचे माझ्या निदर्शनास येते. सबब, आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमचा फायदा देणे योग्य होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील धनादेश हा रक्कम रू. २४,९१५/– चा आहे व सदरील प्रकरण हे सन २०२० पासून न्यायालयात प्रलंबित आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपीने प्रस्तुत प्रकरण फिर्यादीचा उलटतपास न घेता केवळ वेगवेगळे अर्ज दाखल करून लांबवलेले आहे असे दिसून येते. त्याबाबत न्यायालयाने वेळोवेळी आदेश देखील केलेले आहेत. सदर प्रलंबित प्रकरणामध्ये फिर्यादीला झालेला शारीरिक, आर्थिक व मानसिक त्रास याचा एकंदरीतच विचार केला असता आरोपीला कैद व दंड सुनावणे गरजेचे आहे असे या न्यायालयाचे मत आहे व जमा दंड रक्कम फिर्यादीला नुकसानभरपाई देणे न्यायोचित राहील असे देखील या न्यायालयाचे मत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे,

आदेश

१. आरोपी **नवाज नजीर मुजावर** यांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(२) अन्वये परक्राम्य संलेख अधिनियम कायदा कलम १३८ चे गुन्ह्याकामी दोषी ठरवण्यात येत आहे.

२. सदरील गुन्ह्यात आरोपीस सहा महिनेकरिता साधी कैद व दंड म्हणून रक्कम रू. ३५,०००/– (अक्षरी रूपये पस्तीस हजार फक्त) अशी शिक्षा ठोठावण्यात

येते. आरोपीने दंड भरला नाही तर त्यास दोन महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावण्यात येते.

३. सदरील दंड रक्कम ही फिर्यादीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७(३) प्रमाणे नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

४. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

५. आरोपीविरुद्ध शिक्षा अधिपत्र जारी करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.05.05 16:12:46 +0530

(रोहिणी सं. पाटील)

सांगली. **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),**

दिनांक – ०५/०५/२०२६. **सांगली.**

परिशिष्ट – भाग क.

फिर्यादीचे साक्षीदारांची यादी.

क्रमांक.	**निशाणी क्र.**	**नाव**	**पुराव्याचा प्रकार.**
साक्षीदार क्र. ०१	०५	वीरचंद्र सुभाष वळवडे	फिर्यादी

फिर्यादीतर्फे दाखल कागदपत्रांच्या निशाण्यांची यादी

अ.क्र.	**निशाणी क्र.**	**कागदपत्र**
१	निशाणी २८/सा.क्र.१	फिर्यादी निधीचा ठराव.
२	निशाणी २९/सा.क्र.१	आरोपीने दिलेला मूळ धनादेश दि.१०.०७.२०२०.
३	निशाणी ३०/सा.क्र.१	धनादेश परतावा दि. १४.०७.२०२०.

४	निशाणी ३१/सा.क्र.१	रक्कम मागणी नोटीसची स्थळप्रत.
५	निशाणी ३२/सा.क्र.१	पोस्टल पावती.
६	निशाणी ३३/सा.क्र.१	नोटीसीचा लखोटा
७	आर्टिकल 'अ'/सा.क्र.१	पोस्टाचे ऑनलाईन ट्रॅक रिपोर्ट.
८	निशाणी ३४/सा.क्र.१	आरोपीचे कर्ज खाते उताऱ्याची प्रत.
९	निशाणी ३५/सा.क्र.१	दि बँकर्स बुक इव्हीडन्स ॲक्टचे प्रमाणपत्र.
१०	निशाणी ३६/सा.क्र.१	कर्ज मागणी अर्ज.
११	निशाणी ३७/सा.क्र.१	कर्ज मंजुरी पत्र.
१२	निशाणी ३८/सा.क्र.१	तारण आणि कर्जाचा करार.
१३	निशाणी ३९/सा.क्र.१	प्रॉमिसरी नोट.
१४	निशाणी ४०/सा.क्र.१	कर्ज मिळाल्याची पोच पावती.
१५	निशाणी ४१/सा.क्र.१	आरोपीचे हमीपत्र.

आरोपीचे साक्षीदारांची यादी.

क्रमांक.	निशाणी क्र.	नाव	पुराव्याचा प्रकार.
--	----	----	----

आरोपीतर्फे दाखल कागदपत्रांच्या निशाण्यांची यादी

अ.क्र.	निशाणी क्र.	कागदपत्र
--	----	----

न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

अ.क्र.	निशाणी क्र.	कागदपत्र
--	----	----

न्यायालयाच्या निशाण्यांची यादी

अ.क्र.	निशाणी क्र.	कागदपत्र
--	----	----

ROHINI SAMBHAJI PATIL

Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.05.05 16:12:52 +0530

(रोहिणी सं. पाटील)

सांगली. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),

दिनांक – ०५/०५/२०२६. सांगली.

<u>C E R T I F I C A T E</u>

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of steno	:	Shri. S. A. Jamadar
Court Name	:	Smt. R. S. Patil, J.M.F.C., (Court no.1), Sangli
Date of Judgment	:	05/05/2026.
Judgment signed by Presiding Officer on	:	05/05/2026.
Judgment uploaded on	:	05/05/2026.